## मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २९ जुलै :** धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि पहेल मल्टीपर्पज सोसायटी, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम पंचायत वढा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनातही सुलभ, मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा होता. हा उपक्रम देवेश कुमार, मुख्य महाप्रबंधक, धारिवाल यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर मा. डॉ. अनिश नायर, मुख्य व्यवस्थापक, धारिवाल, रूपेश वैरागडे धारिवाल, किशोर वरारकर सरपंच वढा यांची उपस्थिती होती.

## मनपा तर्फे जमनजट्टी परिसरात वृक्षारोपण

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २९ जुलै :** चंद्रपूर महानगरपालिके मार्फत पठाणपुरा गेट बाहेरील जमनजट्टी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम २२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता आयुक्त विपीन पालीवाल यांच्या उपस्थितीत राबविण्यात आला. याप्रसंगी रोपट्यांची लागवड करण्यात आली. शासनातर्फे 'एक पेड माँ के नाम २.०' तसेच 'माझी वसुंधरा' अभियान राबविले जात आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि हरित आवरणात वाढ करून भावी पिढ्यांसाठी सुदृढ पर्यावरणाची जपणूक करणे आहे.

# कर्जबाजारीपणामुळे विष प्राशन करून युवा शेतकऱ्याची आत्महत्या

## धामणगाव येथील घटना

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**गोंडपिपरी, दि. २९ जुलै :** कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडलेल्या गोंडपिपरी तालुक्यातील धामणगाव येथील शेतकऱ्याने ( दि.२८) सकाळी अकरा वाजताच्या दरम्यान विष प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मृत इसमाचे नाव विकास प्रकाश नरुले वय ३३ असून ते धामणगाव येथील रहिवासी होते.

सदर इसम हा तुटपुंजी शेती व मजुरी करून उदरनिर्वाह करीत होता. सततच्या नापिकी, वाढत्या खर्च व कर्जफेडीचा ताण सहन न झाल्यामुळे त्यांनी शेवटी टोकाचे पाऊल उचलले. सकाळी गावालगत असलेल्या शेतात फवारणी साठी गेला असता तिथेच त्याने विष प्राशन केल्यानंतर त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय चंद्रपूर येथे उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचारा दरम्यान दि.२९ पहाटे ५ वाजताच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आई वडील असा आप्त परिवार आहे.

# माथराचे पोलीस पाटील सुरेश चहारे वर्षभरासाठी निलंबित

## उपविभागीय अधिकारी यांची कार्यवाही, गावातील अतिक्रमण प्रकरण भोवले

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २९ जुलै :** माथरा येथील पोलीस पाटील सुरेश हिरामन चहारे यांनी ग्रामपंचायत, खामोना अंतर्गत माथरा गावांतील नाली बांधकामात अडथळा निर्माण केल्याबद्दल वैयक्तिक स्वार्थासाठी पदाचा गैरवापर केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी यांनी २३ जुलै २०२५ च्या आदेशानुसार पोलीस पाटील सुरेश चहारे यांना एक वर्षासाठी निलंबित केले आहे.

माथरा ग्रामपंचायत अंतर्गत सुभाष सिंगमवार यांचे घरापासून ते मारोती धोटे यांच्या घरापर्यंत बांधकाम वे. को.ली. सी.एस.आर. फंडातुन सिमेंट कॉन्क्रेट नालीचे बांधकाम मंजुर करण्यात आले होते. सदर नालीचे बांधकामाला पोलीस पाटील सुरेश चहारे अडथळा निर्माण केला.

माथरा गावातील नालीचे बांधकाम करावयाचे असल्यामुळे खामोना ग्रामपंचायत ने नोटरी/रजिस्ट्री नुसार जागेची मोजणी करुन आपली जागा ताब्यात घेवुन उर्वरीत शासकिय जागेवरील केलेले अतिक्रमण हटविण्यात यावे याबाबत अनेकदा नोटीस देण्यात आली होती. मात्र सचिव/सरपंच, ग्रामपंचायत कर्मचारी प्लॉटची मोजणी करण्यास आले असता त्यास विरोध केला. याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाद मागण्यात आली होती.

खामोना ग्रामपंचायत चे सचिव/सरपंच, ग्रामपंचायत कर्मचारी त्यांचेशी आरेरावीची भाषा वापरणे व शासकिय कामात अडथळा निर्माण करणे, गावांतील शांतता व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअन्वये कर्तव्यात दुर्लक्ष करून कसूर केल्याचा ठपका ठेवीत विभागीय अधिकारी यांनी पोलीस पाटील पदाचा केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम १९६७ चे कलम ९ (ड) अन्वये एक वर्ष मुदतीपर्यंत माथराचे पोलीस पाटील सुरेश चहारे यांना पदाच्या सेवेतून निलंबीत केले आहे.

# अज्ञात ट्रकच्या एक गाय ठार दोन जखमी नागरीकांच्या मदतीने दोन गायीवर उपचार

## मोकाट जनावरांकडे न. प.चे दुर्लक्ष

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २९ जुलै :** आज पहाटेच्या सुमारास ब्रम्हपुरी नागभीड रोड वर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने तीन जनावरांना धडक दिली त्यात एक गाय जागीच ठार झाली तर दोन जनावरे गंभीर जखमी झाल्या.

सकाळच्या सुमारास मॉर्निंग वॉक साठी जाणाऱ्या नागरिकांस नागभीड रोड लावण्या वस्त्र भंडार समोर , हाय वे च्या बाजूला तीन गायी पडून दिसल्या त्यांना सकाळी एका अज्ञात वाहनाने चिरडले असल्याचे दिसले त्यावेळी राजू भागवत व त्यांच्या पत्नीने निरीक्षण केले असल्यास एक गाय मरण पावली होती व एक दोन गायी गंभीर जखमी होत्या , त्यापैकी जखमी गायींना पाणी पाजलं.राजू भागवत यांनी पोलीस स्टेशन , नगर परिषद, खाजगी वेटरनरी डॉक्टरांना फोन केले. डॉ ठोंबरे येऊन दोन जखमी गायींवर उपचार केले .ताबडतोड तिथे पशु प्रेमी तुषार



काटेखाये नाजूक बगमारे , संतू भांडारकर ,अनिता भागवत ,चंचल हलधर उपस्थित झाले यांनी सुध्दा त्या मुक्या जनावरांना वाचवण्यासाठी खूप मदत केली माणुसकीचे दर्शन दिले . परत सकाळी आठ वाजता एक गाय बुरले पेट्रोल पंप समोरील सीडीसी बँक समोर जखमी अवस्थेत दिसली त्यावेळी नागरिकांनी उपचारासाठी धावपळ केली.प्रशांत डांगे यांनी पशु वैद्यकीय अधिकारी पुरी यांना फोन करून बोलविले त्यांनी तात्काळ घटनास्थळी येत जखमी गाई वर उपचार केले. ट्रॅफिक पोलिस राहुल लाखे यांनी घटनास्थळी येऊन नगर परिषदेची गाडी बोलावून पुढील उपचारासाठी हलविण्यात आले.ब्रम्हपुरी शहराच्या हायवेवर मधोमध नेहमीच गुरांचे गोहण बसलेले असतात. राजू भागवत यांनी या बेवारस जनावरांच्या सोयीसाठी नगर परिषदेला आतापर्यंत दोनदा लेखी निवेदन दिले आहे परंतू नगरपालिका प्रशासन याकडे बिलकुल लक्ष देत नाही. यामुळे रस्त्यावर केव्हाही अपघात होऊन प्राणहानी होऊ शकते. नगर परिषद प्रशासनाने या समस्येकडे ताबडतोब लक्ष द्यावे व या बेवारस गुरांच्या मालकांवर सुध्दा कार्यवाही करावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते राजू भागवत यांनी केले आहे.

# श्रमिक पत्रकार संघाचा कर्मवीर पुरस्कार जेष्ठ पत्रकार श्याम ठेंगडी व मंगल जीवने यांना घोषीत

## शुक्रवारी पुरस्कार वितरण सोहळा





**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २९ जुलै :** चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघ चंद्रपूरच्या वतीने शुक्रवार १ ऑगस्ट २०२५ ला सकाळी ११ वाजता पत्रकार दिन व कर्मवीर पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

वरोरा नाका पत्रकार संघाचे कार्यालय येथे आयोजित सोहळ्यात वरोरा येथील जेष्ठ पत्रकार श्याम ठेंगडी व बल्लारपूर येथील जेष्ठ पत्रकार मंगल जीवने यांना कर्मवीर पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून दैनिक नवराष्ट्रचे वृत्त संपादक डॉ.प्रा.गणेश खवसे व प्रमुख अतिथी म्हणून सिडीसीसी बँक

चंद्रपूरचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघाने केले आहे.

# बेशरमाचे झाड लावून शिवसेनेने केला पिडब्लूडी व मनपाचा निषेध

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २९ जुलै :** आज २९ जुलै ला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तुकूम प्रभाग, ताडोबा रोड पी.डब्ल्यू.डी क्रमांक २ चंद्रपूर या परिसरात रस्त्यावरील पडलेले खड्डे, आणि या खड्ड्यांमुळे सर्वसामान्य जनतेला होणार त्रास या मुळे तुकूम परिसरातील जनतेला ये-जा करताना अक्षरशः होणारा त्रास याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पी. डब्ल्यू. डी. प्रशासन तसेच चंद्रपूर महानगरपालिकाचा रस्त्यावरील खड्ड्यात बेशरमाचे झाड लावून निषेध केला.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पी. डब्ल्यू डी .तसेच महानगरपालिका या झोपलेल्या प्रशासनाला जाग यावी.यासाठी आज रोडावर पडलेल्या खड्डे यामध्ये बेशरमाचे झाड लाऊन पी.डब्ल्यू.डी. प्रशासनाचे तसेच चंद्रपूर महानगरपालिकाचे अधिकारी यांना जागृत करत आंदोलन करण्यात आले. या नंतर सुद्धा प्रशासनाच्या अधिकारी कर्मचारी यांनी दखल न घेतल्यास पी.डब्ल्.डी.कार्यालयास ताला मारू आंदोलन घेण्यात येईल. अशा इशारा देण्यात आला.

या आंदोलनात चंद्रपूर महानगर प्रमुख सुरेश पचारे, माजी शहर प्रमुख राहुल विरूटकर, उपशहर प्रमुख प्रमोद कोलारकर, उपशहर प्रमुख राहुल भोयर, बाबुपेठ शाखा प्रमुख रोहन आंबडकर, वैभव घोटेकर, शुभम मंथनवार, आकाश फाले, अजय परसुटकर, अनिकेत साहारे, देवानंद नीमसरकार, विक्की गिरडकर, आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# ग्रामीण रुग्णालय सुरू करा ' मागणी करीता काँग्रेसचे आत्मक्लेश आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २९ जुलै :** हा चंद्रपूर जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक शहर असून शहरात सध्या प्राथमिक आरोग्य केंद्रच सुरू आहेत. महिलांना गरोदरपणात प्रसूतीच्या प्रसंगी सिजर ऑपरेशन करीता जीवघेण्या कळा सोसत चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य



रुग्णालयात २७ किलोमीटरचा अंतर पार करीत जावे लागते सामान्यापेक्षा मोठा असलेल्या कुठल्याही आजारा करीता शहरातील नागरिकांना चंद्रपूरच जावे लागते यामुळे नागरिकांना प्रचंड आर्थिक मानसिक व शारीरिक त्रास सोसावा लागतो.

घुग्घूस शहरात ग्रामीण रुग्णालयाची सुसज्ज इमारत निर्माण झालेली आहे मात्र प्रशासनाला तिचा लोकार्पण करण्यासाठी वेळच मिळत नाही. ग्रामीण रुग्णालय तातळीने सुरु करावा या मागणी करीता काँग्रेस शहर अध्यक्ष राजुरेड्डी यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ७ ऑगस्ट रोजी शासकीय दवाखान्या परिसरातील लॉयड्स मेटल्स गेटच्या शेजारील जागेवर ' आत्मक्लेश' आंदोलन करण्यात येत असून सदर आंदोलनात जास्तीत - जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन शहर काँग्रेस महिला काँग्रेस व काँग्रेसच्या सर्व फ्रँटल ऑरगनायझेशनच्या वतीने करण्यात आले.

# माझ्यावर जितक प्रेम करता त्याहून जास्त पक्षावर प्रेम करा : माजी आमदार प्रा. अतुल देशकर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २९ जुलै :** भाजपाचे नेते व माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहर व तालुक्याच्या वतीने कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन येथील विठ्ठल रुक्मिणी सभागृहात करण्यात आले होते.

या मेळाव्याला विशेष अतिथी म्हणून माजी खासदार तथा भाजपाचे अनु. जमातीचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. अशोक नेते व भाजपा चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष हरीश शर्मा उपस्थित होते. ब्रह्मपुरी तालुक्यातील व शहरातील हजारो कार्यकर्त्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहून माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांना शुभेच्छा दिल्या.



या प्रसंगी कार्यकर्त्यांना संबोधित करतांना उत्सव मूर्ती भाजपा नेते प्रा. अतुल देशकर यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले. सोबतच माझ्यावर जितक प्रेम करता त्याहून जास्त पक्षावर प्रेम करा असे प्रतिपादन करत प्रा. अतुल देशकर यांनी आपल्या संघटनशील वृत्तीचे पुन्हा एकदा दर्शन दिले.

कार्यक्रमा प्रसंगी बोलताना माजी खासदार डॉ. अशोक नेते यांनी प्रा. अतुल देशकर पक्षातील प्रामाणिक व संघटनशील नेतृत्व असल्याचे गौरवद्वार करत माजी आमदार प्रा. देशकर यांना दीर्घायुषाच्या शुभेच्छा दिल्या. तर भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांनी प्रा. अतुल देशकर यांना शुभेच्छा देत प्रा. अतुल देशकर हे जनमनातील लोकप्रिय नेतृत्व असल्याचे प्रतिपादन केले. मागील १२ वर्षापासून कोणत्याही संविधानीक अथवा संघटनेतील पदावर नसतांना सुद्धा भाजपा नेते प्रा. अतुल देशकर यांना शुभेच्छा देण्यासाठी हजारोंच्या संख्येने जनतेची उपस्थिती ही त्यांच्या नेतृत्वाची पावती असल्याचे मत हरीश शर्मा यांनी व्यक्त केले.

यावेळी भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश परिषदेत जेष्ठ नेते प्रा. कादर शेख यांच्या नियुक्ती बद्दल सत्कार करण्यात आला व नव नियुक्त शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे व तालुका मंडळ अध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे यांच्या सह कार्यकारोणीतील पदाधिकारी व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच माजी शहर व तालुका अध्यक्ष अरविंद नंदूरकर व प्राचार्य अरुण शेंडे माजी तालुका व शहर सरचिटणीस मनोज वठे व गोपाल कावळे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी ब्रह्मपुरी शहरातील अनेक युवा, महिला व मान्यवरांनी भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला. सन्मित्र क्रीडा मंडळ व महाराष्ट्र बास्केटबॉल फेडरेशनच्या वतीने प्रा. अतुल देशकर यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले .यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे, माजी जि. प उपाध्यक्ष कृष्णा सहारे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे, मावळते तालुका अध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे, मावळते शहर अध्यक्ष अरविंद नंदूरकर उपस्थित होते.

# आगामी निवडणुकीत निवडून येणाऱ्यांना संधी मिळणार -आमदार देवराव भोंगळे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २९ जुलै :** येत्या दोन महिन्यांनतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीचे पडघम वाजायला सुरवात होणार आहे. त्या अनुषंगाने सर्वच पक्षाचे नेते मंडळी गुप्त बैठकाचे आयोजन करून कार्यकर्त्याशी संवाद साधताना दिसत आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत सर्वांना धक्का देत भाजपचे देवराव भोंगळे यांनी अटीतटीच्या लढतीत विजय खेचून आणले. मागील पाच महिन्यापासून देवराव भोंगळे यांनी शेतकरी संघटना आणि काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेशाचा धडाका सुरु केलेले आहे. तसेच आगामीस्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडणूक समोर ठेऊन शेतकरी संघटना आणि काँग्रेस पक्षाचे शेकडो कार्यकर्ते भाजपात भाऊ गर्दी करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



काँग्रेस आणि शेतकरी संघटना पक्षाचे अनेक नेते आणि कार्यकर्ते भाजप पक्षात सामील होत असल्याने त्या सर्वांना सामावून घेणे हे जिकरीचे काम देवराव भोंगळे यांना त्रासदायक ठरणार आहे अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. .तसेच सुदर्शन निमकर आणि संजय धोटे यांचे समर्थकांना सुद्धा तिकीट वाटपात स्थान देताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे यात काही शंका नाही. मात्र राजकीय क्षेत्रात चाणक्य म्हणून ओळखले जाणारे देवराव भोंगळे यावर मात करून येणाऱ्या निवडणुकीत भाजप एकजुटीने काम करेल अशी चर्चा भाजप कार्यकर्ते मध्ये सुरु आहे.

आगामी स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत जे उमेदवार निवडून येण्याची क्षमता असेल त्याच उमेदवाराला तिकीट देण्यात येईल असे आमदार देवराव भोंगळे यांनी महासागर तालुका प्रतिनिधी जवळ मत व्यक्त केले. कारण यावेळी राजुरा नगरपालिका मध्ये पहिल्यांदा भाजपची सत्ता काबीज करण्यास आमदार देवराव भोंगळे यांनी चंग बांधले आहे अशी चर्चा सुरु आहे. तसेच ही निवडणूक आमदार करिता प्रतिष्ठेची राहील यात काही शंका नाही.त्यामुळे कोणत्याही परिस्तिथी राजुरा नगर पालिकेवर भाजपची सत्ता आण्याकरिता आमदार आपल्या कार्यकर्त्या सोबत एकजुटीने निवडणूकीच्या लढाईत उतरेल यात काही शंका नाही अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

# महाजेनकोच्या तंत्रज्ञ ३ च्या भेदभावात्मक भरतीवर उच्च न्यायालयात प्रश्नचिन्ह

## दोन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २९ जुलै :** महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित (महाजेनको) यांच्या टेक्निशियन ग्रेड-३ पदासाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील भेदभावात्मक अटींविरोधात दाखल याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण दखल घेतली.



न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने महाजेनकोला नोटीस बजावत दोन आठवड्यांत सविस्तर उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

ही याचिका सौरभ मादासवार आणि जगन्नाथ पिदूरकर या उमेदवारांनी दाखल केली असून, यामध्ये तीन प्रमुख आक्षेप घेण्यात आले आहेत.

केवळ कोराडी गावातील उमेदवारांना २५ अतिरिक्त गुण देणे, प्रकल्पग्रस्तांसाठी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण, आणि (३) CSR प्रशिक्षण घेतलेल्या सामान्य प्रवर्गातील उमेदवारांना २५ पर्यंत बोनस गुण देणे.

याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. दीपक चटप यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, या अटी संविधानातील अनुच्छेद १४ व १६ चे उल्लंघन करतात आणि त्या सेवा नियमावलीत सामील नसल्याने कायदेशीर अधिकारविहीन आहेत.

उच्च न्यायालयाने दखल घेत महाजेनकोला उत्तर सादर करण्याचे आदेश दिल्याने महाराष्ट्रातील इतर प्रकल्पग्रस्त व सामान्य उमेदवारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असल्याचे मत याचिकाकर्ते सौरभ मादासवार यांनी व्यक्त केले. महाजेनकोकडून उत्तर सादर केल्यानंतर खटल्याची पुढील सुनावणी निश्चित होणार आहे.

# नागपंचमीच्या पर्वावर भद्रशेष मंदिरात भाविकांची गर्दी

## पोलिसांचा मंदिर सभोवताल कडेकोट बंदोबस्त

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २९ जुलै :** चंद्रपूर जिल्ह्याचे आराध्य दैवत माता महाकाली मंदिर असून त्याच जिल्ह्यात भद्रावती तालुक्यात ऐतिहासिक नगरीत भद्रनाग मंदिर देवस्थान सुद्धा दर्शनासाठी प्रचलित आहे. त्यामुळे दर्शनासाठी भाविकांची गर्दी पहावयास मिडाली.

दि २९ जुलै ला नागपंचमीच्या पर्वावर येथे महाराष्ट्रातून नव्हे तर बाहेरील राज्यातून सुद्धा असंख्य भक्त नागपंचमीच्या च्या पर्वावर मंदिरात दर्शनासाठी येतात.



येथे भद्रनाग विश्वस्त मंडळ भद्रावती च्या वतीने भाविकांना सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या असून त्यांची गैरसोय होऊ नये करिता महिला आणि पुरुषांची वेगळी तसेच दिव्यांग आणि वृद्धांसाठी वेगळी रांग बनवून व्यवस्था केली आहे. नवसाला पावन असणारे हे प्राचीन काळातले भद्रनाग मंदिर आहे. एका दिवस अगोदर पासून भाविक दर्शनासाठी येत असून या दिवशी पहाटेला मूर्तीची अभिषेक करून आरती झाल्यानंतरच दर्शनासाठी प्रवेश द्वार उघडण्यात येत असतो.

या नागपंचमीच्या पर्वावर भाविकांची गैर सोय टाळण्याकरिता आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी मंदिर सभोवतालचा संपूर्ण परिसर हा भद्रावती पोलिसांच्या निगराणीत असून , वाहनांची गर्दी होऊ नये करिता जुना बस स्थानकापासून मुख्य मार्गावर बॅरीगेट लावून वाहतूक पोलिसांचा चोख बंदोबस्त केला आहे. नागपंचमीचा या यात्रेला भद्रनाग विश्वस्त मंडळ भद्रावती , पोलीस प्रशासन तथा नगर परिषद प्रशासनानि मोलाचे सहकार्य केले आहे.

